श्री प्रशांत दत्तात्रय भगत, तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती नगर यांचे विभागीय चौकशी प्रकरणी अंतिम कारवाई करणेबाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि/आस्था-३/३३३०७२९/७३४/२०२६
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १. पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अहिल्यानगर यांचेकडील पत्र जा.क्र. असीबी/नगर/१५५१/२०१४ दिनांक ०६/०९/२०१४

२. इकडील निलंबन आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/१३२२/२०१४ दिनांक १५/०९/२०१४

३. इकडील दोषारोपपत्र जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/५०६/२०१६ दिनांक २०/०४/२०१६

४. श्री भगत पी डी, कनि सहा, यांचा खुलासा दिनांक ११/०५/२०१६

५. इकडील आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/९०६/२०१६ दिनांक १३/०६/२०१६

६. मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडील आदेश.क्र.विआशा/कार्या-१९/ आस्था-४/१८५९८/२०१६ जा.क्र.७५२५ दिनांक ३०/०४/२०१६

७. इकडील आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/६९७/२०१६ दिनांक १७/०६/२०१६

८. सहाय्यक आयुक्त (चौकशी), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग नाशिक यांचे-कडील चौकशी अहवाल क्र.विशा-४/खाचौ/सी.आर/१३९/२०१६ दिनांक २७/१२/२०१६

९. मा. विशेष न्यायालय अहिल्यानगर यांचेकडील न्याय निर्णय दिनांकक २६/१२/२०१७

१०. मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील न्याय निर्णय दिनांक १३/०३/२०२६

११. श्री प्रशांत दत्तात्रय भगत, वरिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग (प्राथ) जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील विनंती अर्ज दिनांक २५/०५/२०२६

१२. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा..) नियम १९८१ मधील नियम ७२ (३)

१३. विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील नियम ४.७ (१)

श्री. प्रशांत दत्तात्रय भगत, तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती नगर, यांना लाचलुचपत प्रकरणी अटक करणेत आलेने संदर्भ क्रमांक २ च्या आदेशान्वये सेवेतुन सेवा निलंबित करणेत आलेले होते. संदर्भ क्रमांक ३ नुसार सदर प्रकरणी श्री.भगत यांचेवर ज्ञापन/ दोषारोपपत्र १ ते ४ बजावणेत आले. श्री भगत यांनी सदरचे दोषारोप अमान्य केलेने विभागीय चौकशी प्रस्तावित करणेत आली. श्री. भगत यांना विभागीय चौकशीच्या अधिन राहुन संदर्भ क्रमांक ७ च्या आदेशान्वये जिल्हा परिषद सेवेत पुनस्थापित करणेत आले.

श्री.भगत यांची विभागीय चौकशी पुर्ण होऊन सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग नाशिक यांचेकडील दिनांक २७/१२/२०१६ नुसार चौकशी अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला. सदर चौकशी अहवालात श्री भगत यांचेवर कोतवाली पोलीस स्टेशन अहिल्यानगर येथे भाग-६ गु.र.नं.३०९९/२०१४ अन्वये भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम प्र.का.क.७,१२,१३(१-ड) सह १३ (२) नुसार गुन्हा दाखल असलेने प्रकरण न्यायप्रविष्ठ असलेचे निष्कर्ष प्राप्त झाले होते.

..२

संदर्भ क्रमांक ९ नुसार मा. विशेष न्यायालयाने श्री भगत यांना दोषमुक्त केले. सदर निकाला विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अहिल्यानगर कार्यालयाने मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे अपिल दाखल केलेले होते. सदर अपिलावर निर्णय होऊन मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दिनांक १८/०३/२०२६ अन्वये त्यांना दोषमुक्त केलेले आहे.

संदर्भ क्रमांक ११ नुसार श्री भगत यांनी त्यांना मा. न्यायालयाने लाचलुचपत प्रकरणी दोषमुक्त केलेने त्यांचा दिनांक १८/०९/२०१४ ते दिनांक २३/०६/२०१६ अखेर निलबन कालावधी कर्तव्य कालावधी म्हणुन नियमित करणेस विनंती केलेली आहे.

सबब मा. विशेष न्यायालय अहिल्यानगर तसेच मा उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद न्यायालयाने श्री प्रशांत दत्तात्रय भगत, तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती नगर यांना लाचलुचपत प्रकरणी दोषमुक्त केलेले असलेने विभागीय चौकशी नियमपुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ नियम ४.७ (१) मधील तरतुदीनुसार श्री प्रशांत दत्तात्रय भगत, तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती नगर यांना विभागीय चौकशीतुन दोषमुक्त करणेत येत आहे. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टकाणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ७२ (३) नुसार श्री. प्रशांत दत्तात्रय भगत, तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक यांचा दिनांक १८/०९/२०१४ ते दिनांक २३/०६/२०१६ अखेरचा निलंबन कालावधी हा सर्व प्रयोजनार्थ कामावर व्यतीत केलेला कालावधी मानण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री. प्रशांत दत्तात्रय भगत, वरिष्ठ सहाय्यक, यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202608180401S3 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 18-08-2026 22:26:09
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. प्रशांत दत्तात्रय भगत, वरिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग (प्राथ) जिल्हा परिषद अहिल्यानगर
द्वारा:- शिक्षणाधिकारी (प्राथ) जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:- माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव

१. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
२. शिक्षणाधिकारी (प्राथ) जिल्हा परिषद अहिल्यानगर
३. निवड नस्ती

स्वाक्षरी/--
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर